## महाराष्ट्र शासन

### ग्रामीण विकास व जलसंधारण विभाग

### उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, यवतमाळ कंत्राटी पद भरती -२०१७

**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, ३०७ रूम नं., तिसरा मजला, जिल्हा परिषद यवतमाळ -४४५००१**

१) एमएसआरएलएम /एचआर/ प्र.क्र.- ४३६/ ९४९ /२०१७ दिनांक १७/०४/२०१७

२) शासन निर्णय क्रमांक :मजीअ २१०७/प्र.क्र.५९/योजना ३ दिनांक ०७ जुलै २०१७

३) मा.मूकाअ MSRLM मुंबई यांचे पत्र क्र.एमएसआरएलएम/ एचआर/प्र.क्र ४३६/२१२९/२०१७ दि.१३.०९.२०१७

४) मा.मूकाअ MSRLM मुंबई यांचे पत्र क्र.एमएसआरएलएम/ एचआर/प्र.क्र ४३८/२१३०/२०१७ दि.१३.०९.२०१७

ग्रामीण भागातील दारिद्र निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामीण विकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थ सहाय्याने दीनदयाळ अंत्योदय योजनाची सुरुवात केलेली आहे. या अभियानाच्या माध्यमातून ‘गरिबांचे आर्थिक व सामाजिक समावेशन करणे तसेच गरिबांनी, गारीबांसाठी व गरिबांच्या स्वयंचलित आणि शाश्वत संस्था उभ्या करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहेत. या उद्देशपूर्तीसाठी महाराष्ट्र शासनाने ग्रामविकास विभागांतर्गत संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना ची स्थापना केलेली आहे. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, राळेगाव, पांढरकवडा, झरीजामनी, कळंब,घाटंजी,महागाव, मारेगाव, पुसद, दारव्हा, दिग्रस, नेर, आर्णी, उमरखेड, यवतमाळ, व वणी येथील खालील पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या करार तत्वावर भरवायची आहेत. उपरोक्त शासन निर्णयातील निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष यवतमाळ मध्ये खालील प्रमाणे नमूद पदे सरळसेवा पद्वतीने स्पर्धा परीक्षा घेऊन भरवायची आहे. सदर पदे भरण्याकरिता इच्छुक व पात्र उमेदवाराकडून सदर जाहिरातीव्दारे Online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.Online व्यतिरिक्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

परीक्षेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची तारीख | २५/१०/२०१७ |
| ४ | ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख | ०७/११/२०१७ |
| ३ | संगणकीय चलानद्वारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये परीक्षा शुल्क स्वीकृतीचा कालावधी | ०८/११/२०१७ |
| ४ | परीक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या चार दिवस अगोदर संकेतस्थळावर सुरु राहील. |
| ५ | लेखी परीक्षा दिनांक | http://maharecruitment.mahaonline.gov.in व http://yavatmal.nic.in व www.zpyavatmal.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ६ | हेल्पलाईन क्र | ०२२-६१३१६४०३ mr.support@mahaonline.gov.in Suvidha.mahaonline.gov.in |

**१.उपलब्ध पदसंख्या -आरक्षणानुसार भरावयाचा पदांचा तपशिल खालीलप्रमाणे**

१)पदाचे नाव :- प्रभाग समन्वयक (क्लस्टार कॉर्डीनेटर) दरमहा मानधन :- २०५००/-

| प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | समांतर आरक्षण व्यतिरिक्त | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जा | ६ | २ | १ | ० | ० | ० | १ | | २ | ६ |
| अ.ज | ८ | २ | १ | ० | ० | ० | १ | | ४ | ८ |
| विज अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| भज ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| भज क | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| भज ड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| विमाप्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| इमाव | ६ | २ | १ | ० | ० | ० | १ | | २ | ६ |
| खुला | २४ | ७ | ४ | १ | १ | ० | २ | | ९ | २४ |
| **एकूण** | ५० | १४ | ७ | १ | १ | ० | ५ | | २२ | ५० |

**२)पदाचे नाव :- प्रशासन व लेखा सहय्यक दरमहा मानधन :- १५०००/-**

| प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | समांतर आरक्षण व्यतिरिक्त | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जा | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | | १ | २ |
| अ.ज | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| विज अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| भज ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| इमाव | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | | १ | २ |
| खुला | ६ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ६ |
| **एकूण** | १३ | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ८ | १३ |

**३)पदाचे नाव :- डाटा एन्ट्री ऑपरेटर दरमहा मानधन :- १००००/-**

| प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | समांतर आरक्षण व्यतिरिक्त | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जा | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | | १ | २ |
| अ.ज | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| विज अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| भज ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| इमाव | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | | १ | २ |
| खुला | ६ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ६ |
| **एकूण** | १३ | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ८ | १३ |

**४)पदाचे नाव :- शिपाई** **दरमहा मानधन :- ८०००/-**

| प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | समांतर आरक्षण व्यतिरिक्त | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जा | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| अ.ज | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| विज अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| भज ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | १ |
| इमाव | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | | १ | २ |
| खुला | ७ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ७ |
| **एकूण** | **१३** | **३** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **९** | **१३** |

**५) पदाचे नाव :-प्रशासन सहाय्यक** **दरमहा मानधन :- १५०००/-**

| प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | समांतर आरक्षण व्यतिरिक्त | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

**टीप :-**

१) अपंगाची पदे भरतांना सामान्य विभागाचे परिपत्रक दिनांक १९/०३/२०१० मधील सूचनेनुसार अपंगांची पदे सामाजिक प्रवर्गात दर्शविण्यात आलेली आहे मात्र गुणवत्तेनुसार निवड झालेला उमेदवार ते ज्या सामजिक प्रवर्गात असतील त्या सामाजिक प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेण्यात येईल अशा परीस्थितीत जेवढी अपंगाची पदे भरण्यात येईल त्या सामाजिक आरक्षणातील इतर पदामधून कमी करण्यात येईल

२) उपरोक्त अ.क्र. १ ते ४ मध्ये दर्शविलेल्या पद्संखेमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता असून सर्व अधिकार अध्यक्ष उमेद एम.एस.आर.एल.एम. निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांनी राखून ठेवले आहेत.

**२.उमेद, MSRLM तालुकास्तरीय पदासाठी शैक्षणिक पात्रता विषयक अटी**

| अ. क्र. | पदाचे नाव दरमहा मानधन | आवश्यक शैक्षणिक आर्हता | एकूण अनुभव (किमान वर्ष) |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समन्वयक (क्लस्टार कॉर्डीनेटर) रु २५०००/- प्रतिमहा | कोणत्याही शाखेतील पदवी | ग्रामीण भागातील /सामाजिक क्षेत्रातील / दारिद्र्य निर्मुलना उपजीविका, वंचित घटक ई. समवेत सामाजिक समावेशन व संस्था बांधणी इत्यादी कामाचा किमान ३ वर्ष अनुभव आवश्यक |
| २ | प्रशासन व लेखा सहाय्यक रु १५०००/- प्रतिमहा | वाणिज्य शाखेतील पदवी<br>१)इग्रजी टायपिंग वेग ४० WPM आणि<br>२) मराठी टायपिंग वेग ३० WPM परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक व MS-CIT उत्तीर्ण आवश्यक | किमान ३ वर्ष प्रशासकीय व लेखाविषयक कामाचा अनुभव |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | डाटा एन्ट्री ऑपरेटर<br>रु १००००/- प्रतिमहा | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण(इयत्ता १२ वी)<br>१)इंग्रजी टायपिंग वेग ४० WPM आणि<br>२) मराठी टायपिंग वेग ३० WPM परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक व MS-CIT उत्तीर्ण आवश्यक | किमान ३ वर्ष डाटा एन्ट्री ऑपरेटर (संगणक परिचालक) कामाचा अनुभव |
| ४ | शिपाई<br>रु ८०००/- प्रतिमहा | १० वी ची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे | किमान ३ वर्ष शासकीय कार्यालय/ संस्था/ कंपनी मधील कामाचा अनुभव |
| ५ | प्रशासन सहाय्यक | कोणत्याही शाखेतील पदवी<br>१)इंग्रजी टायपिंग वेग ४० WPM आणि<br>२) मराठी टायपिंग वेग ३० WPM परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक व MS-CIT उत्तीर्ण आवश्यक | किमान ३ वर्ष प्रशासकीय कामाचा अनुभव |

**३) वयोमर्यादा :-**

उमेदवाराची वयाची किमान व कमाल मर्यादा हि ०१/१०/२०१७ रोजीच्या दिनांकास परीगणित करण्यात येईल. अर्ज करण्याचे अंतिम दिनांकास सर्वसाधारण उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. उच्च वयोमर्यादेत खालील बाबतीत शिथिलक्षम आहे. त्यानुसार खालील समांतर आरक्षणातील व या जाहिरात नमूद प्रवर्गातील उमेदवार अर्ज करू शकतात.

३.१ अपंग उमेदवारासाठी : ४५ वर्षापर्यंत

३.२ प्रकल्पग्रस्त भूकंपग्रस्त उमेवारांसाठी : ४५ वर्षापर्यंत

३.३ माजी सैनिक उमेवारांसाठी : सशस्त्र दलातील सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्ष तसेच अपंग माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग ३ मधील पदासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत

३.४ पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी : ४६ वर्षापर्यंत

३.५ खेळाडू उमेदवारांसाठी : ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल

**४) परीक्षा शुल्क :-शासन निर्णय साप्रवि,दिनांक ११ मार्च २०१५ अन्वये**

प्रस्तुत भरती प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क राहील

| मागासवर्गीय उमेद्वाराकरिता | खुल्या प्रवर्गातील उमेद्वाराकरिता |
|---|---|
| १५० | ३०० |

वरीलप्रमाणे परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

**टीप**-माजी सैनिक उमेदवारांना आवेदन शुल्क भरण्याची आवश्यकता नाही परंतु महाऑनलाईन लिमिटेड चे शुल्क व सेवा शुल्क रु २३/-(तेवीस)भरणे अनिवार्य राहील.अर्जात माजी सैनिक असा उल्लेख असणे आवश्यक आहे.कागद पत्र तपासणी च्या वेळी उमेदवार माजी सैनिक नसल्याचे आढळून आल्यास अर्ज रद्द करण्यात येऊन फौजदारी स्वरूपाचा गुन्हा नोंद्विण्यात येईल.

**५)** online पद्धतीने अर्ज सादर करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

५.१ प्रोफाईल निर्मिती/प्रोफाईल अद्यावत करणे.

- http://maharecruitment.mahaonline.gov.in व http://yavatmal.nic.in या संकेत स्थळावर वापर करत्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरिता नवीन वापर कर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉगीन पृष्ठ प्रदर्शित करेल नवीन खाते (वापर कर्त्याचे नाव लॉगीन व पासवर्ड) निर्माण करण्यासाठी लॉगीन पृष्ठा द्वारे विचारलेली माहिती भरून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.
- प्रोफाईल द्वारे माहिती भरताना उमेदवाराकडे स्वतःचाच नित्य वापरात असलेला इमेल आयडी व मोबाईल क्रमांक असणे आवश्यक आहे.
- भरती प्रक्रीयेच्या दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती online देण्यात येणार असल्याने भरतीप्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर इमेल आयडी व मोबाईल क्रमांक वैध/कार्यरत राहाणे आवश्यक आहे.
- वरीलप्रमाणे प्रोफाईल ची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वतःचा login ID व Password द्वारे प्रवेश करून प्रोफाईल मध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती संपर्क तपशील इतर माहिती शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशिलाची अचूक नोंद करावी.

- online पद्धतीने अर्ज करताना उमेदवाराने स्वतःचा अद्यावत फोटो (रुंदी ३.० सेमी X उंची ४.५ सेमी) व स्वतःची स्वाक्षरी (रुंदी ३.० सेमी X उंची २.५ सेमी) आणि ३०० DPI Resolution आणि ५० KB पेक्षा कमी साईज होईल अशा विहित पद्धतीने स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य आहे.(टिप:- फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी.) प्रवेशपत्रावर/अर्जावर दुसऱ्याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.
- स्कॅन करून अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र/हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्यावेळी,प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्यकोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**५.२ अर्ज सादरीकरण.**

- दिलेल्या संकेत स्थळावर वापरकर्त्याने स्वतःचा युजर आयडी व पासवर्डद्वारे यशस्वीरीत्या प्रवेश (Login) केल्यानंतर **"ऑनलाईन अर्ज"** येथे क्लिक करावे.
- उमेदवाराच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रणा वैधता तपासेल. वापरकर्ता जाहिरातीतील निकष पूर्ण करीत असल्यास वापरकर्त्याला अर्ज सादर करता येईल.
- जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीत नसल्यास माहिती संग्रहित होऊ शकत नाही असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.अर्ज यशस्वीरीत्या सादर झाल्यानंतर तुमचा अर्ज यशस्वीरीत्या जतन झाला असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.
- **"रक्कम भरा"** या पर्यायावर क्लिक करून अर्जदाराला क्रेडीट कार्ड/डेबिट कार्ड/ नेट बँकिंग द्वारे भरणा करता येईल अथवा अर्जदार ऑनलाईन अर्ज सादर करून भारतीय स्टेट बँकेमध्ये चालानद्वारे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्वीकारू शकेल.

**५.३) शुल्क भरणा.**

यशस्वीरीत्या अर्ज केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता खाली नमूद केलेल्या पद्धतीचा अवलंब करावा.

- शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील **"माझे खाते"** या लिंक वर क्लिक करावे.
- "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केल्याची माहिती शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. पदासमोर "Unpaid" असे लिहिलेले असेल. त्या ठिकाणी "Pay Now" अशी लिंक उपलब्ध असेल.
  "Pay Now" या लिंकवर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट, (ब) चलनाद्वारे.
- ड) क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेट बँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईनपेमेंट करता येईल.
- चलनाद्वारे पर्याय निवडल्यास उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.
- भारतीय स्टेट बँकेमध्ये चालान द्वारे शुल्क भरावयाचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्या पुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.
- चालान द्वारे शुल्क स्वीकारण्याकरिता भारतीय स्टेट बँक उमेदवाराकडून परीक्षा शुल्क व्यतिरिक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेद्वारास चालान द्वारे शुल्क भरताना परीक्षा शुल्क+ बँकेचे सेवा शुल्क भरावे लागतील.

**६.प्रवेश पत्र-**

जाहिरातील नमूद पदाकरिता परीक्षा प्रवेश पत्र उमेदवारास http://maharecruitment.mahaonline.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.सदर पत्र पोस्टाने पाठविले जाणार नाही.परिक्षाच्या वेळी उमेदवारांनी प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे.उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वतः चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील.(उदा.आधार कार्ड,PAN कार्ड,निवडणूक ओळखपत्र,वाहन परवाना)

**७. परीक्षेचे स्वरूप व निवड पद्धती :-**

| अ.क्र. | पदाचे नाव | गुण |
|---|---|---|
| १ | प्रभाग समन्वयक (CC) | (80 लेखी व मुलाखत २० असे एकूण १०० गुण) |
| २ | १.प्रशासन/लेखा सहाय्यक २.प्रशासन सहाय्यक ३.डाटा एन्ट्री ऑपरेटर ४.शिपाई | १०० लेखी गुण |

- ७.१) लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. निगेटिव्ह मार्किंग पद्धत असणार नाही. वरील पैकी प्रभाग समन्वयक (CC) या पदाकरिता दि १३/०९/२०१७ च्या पत्रान्वये लेखी परीक्षेमध्ये मराठी १४गुण,इंग्रजी १४गुण,सामान्य ज्ञान१४गुण,बौद्धिक चाचणी १४गुण,सामाजिक शास्त्र १४गुण व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान १० गुण

यााप्रमाणे ८० गुणांची लेखी परीक्षा व २० गुणांची (मुलाखत) घेऊन गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यात येईल.व १.प्रशासन/लेखा सहाय्यक २.प्रशासन सहाय्यक ३.डाटा एन्ट्री ऑपरेटर ४.शिपाई या पदाकरिता दि १३/०९/२०१७ च्या पत्रान्वये लेखी परीक्षेमध्ये मराठी २०गुण,इंग्रजी २०गुण,सामान्य ज्ञान२०गुण,बौद्धिक चाचणी २०गुण,व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान २०गुण यााप्रमाणे १०० गुण गुणांची लेखी परीक्षा असून गुणानुक्रमे उमेदवाराची निवड करण्यात येईल.

- ७.२) सामान्य प्रसाशन विभाग शासन निर्णय दि १९.१०.२००७ मधील परिच्छेद क्रमांक ६ (२) नुसार ज्या पदाकरिता पदवी हि कमीत कमी अर्हता आहे. अशा पदाकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता१२वी)च्या दर्जाच्या समान राहील
- ७.३)परीक्षेचा निकाल तयार करतांना ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रनीमं /१२१५ /(प्र.क्र.५५/१५)/१३-अ दि ०५/१०/२०१५ मधील निकषावर लावला जाईल.
- ७.४) शासन परिपत्रक क्रमांक -एसआरव्ही-२०१७ /प्र.क्र.३१/९८/*१६-अ दि १६ मार्च १९९९ तसेच शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही -२०१२ /प्र.क्र.१६//१२/१६-अ दि १३ ऑगस्ट २०१४ मधील तरतुदीनुसार समांतर आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी विहित केलेली कार्यपध्दती अनुसरली जाईल.

**८.सर्व पदाकरिता सर्वसाधारण अटी व शर्ती:-**

- प्रकल्पग्रस्त भूकंपग्रस्त उमेवाराना संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी /जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे कडील प्रकल्पग्रस्त भूकंपग्रस्त प्रमाणपत्राच्या सत्यप्रती प्रमाणपत्र तपासणीवेळी सादर कराव्या लागतील. प्रत्यक्ष निवड झालेल्या उमेदवारांना प्रमाणपत्राची पडताळणी झाल्यानंतर नियुक्तीबाबत विचार करण्यात येईल.
- अंशकालीन उमेदवारांनी त्याच्या शासकीय अथवा निमशासकीय सेवेतील नियुक्त्यामध्ये तीन वर्ष पूर्ण अंशकालीन म्हणून काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केलेल्या सर्व अंशकालीन उमेदवारांना अनुभव प्रमाणपत्र तपासणी वेळी सादर करावे लागेल.प्रत्यक्ष निवड झालेल्या उमेदवारांच्या प्रमपात्राची पडताळणी झाल्यानंतरच नियुक्तीबाबत विचार करण्यात येईल. नियुक्ती आदेश निर्गमित करण्यापूर्वी उमेदवारांचे अंशकालीन म्हणून काम केल्याबाबतचे तहसील कार्यालय व रोजगार स्वयंरोजगार कार्यालयाने दिलेले मूळ प्रमाणपत्र जमा करून घेण्यात येईल.
- अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण व वयोमर्यादेच्या शिथिलतेबाबत शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक रक्रीधो -२०००/प्र.क्र.६८/क्रीयूसे -२ दिनांक ३० एप्रिल २००५ मधील तरतुदीनुसार खेळाडूसाठी राखीव असलेल्या पदावर निवडीसाठी अर्हता पुढील प्रमाणे असेल. सदर पदासाठी त्या त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम,व्दितीय, तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू राज्य अजिक्यपद स्पर्धा या सदर खेळाच्या महाराष्ट्र ऑलपिक असोशिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलंपिक असोसिएशनने स्वतः आयोजित केले असाव्यात.वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरूपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.खेळाडूच्या आरक्षित पदावर नेमणूकी करिता ज्या खेळाडूंची निवड होईल त्याची प्रमाणपत्रे संचालक क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे याचे कडे तपसणी साठी पाठविण्यात येईल व प्राप्त अहवलानुसार नियुक्ती बाबत विचार करण्यात येईल.
- शासन परिपत्रक क्रमांक पीआरई -२००४ /३८५५/प्राशी १.१ दिनांक 2 जून २००५ नुसार माजी सैनिक य समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसताना सैनिक सेवेत मृत्यू झालेला किंवा अपंगत्व येऊन नौकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूबातील फक्त जवानाची पत्नी किवा अपंग जवानाची पत्नी यांना नियुक्ती देण्याचे धोरण आहे.त्यानंतर त्यांची अविवाहित मुलगी अविवाहित मुलगा याचा समावेश आहे व त्याच्या १५ टक्के समांतर आरक्षणातून विचार करण्यात येईल.
- अनुसूचित जाती व जमाती वगळता विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग या मधील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत सक्षम अधिकार्याचे कागदपत्र तपासणीचे दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.
- शासकीय व निमशासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्रधीकार्याची मंजुरी घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. अर्जात विभाग प्रमुखांनी दिलेल्या परवानगीचा क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.
- महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक ८२/२००१/मसेआ००/प्र.क्र.४१५/का-2/दि. २५ मे २००१ मधील तरतुदीनुसार खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना सदर शासन निर्णयात पिरीशिष्ट -3 मध्ये दिलेले खुल्या प्रवर्गात उन्नती व्यक्ती /गट (क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याचे सक्षम अधिकार्याचे कागदपत्र

तपासणीचे दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.तसेच पुरेशा प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतरत्र अदलाबदल न करता त्याच प्रवर्गातील पुरुष उमेवारांमधून राखीव असलेली पदे भारण्यात येतील.

- सामान्य प्रशासन अधिसूचना क्रमांक एसआरव्ही -२०००/प्र.क्र.(१७/२०००)१२ दिनांक २८-मार्च २००५ व सामन्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही -२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १जुलै २००५ नुसार लहान कुटुब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे (अविवाहित उमेदवारांनी सुध्दा लागू नाही असे नमूद करून सदर प्रतिज्ञा पत्र सादर करणे आवश्यक आहे)
- सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०११ /प्र.क्र.१०६४ /२०११/ १६-ब दिनांक १२ दिसेबर २०११नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाचे दिनांकापासून ६ महिन्याचे आत सादर करण्याच्या अटीवर व मा सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे अधीन राहून नियुक्ती दिली जाईल सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्रासाठी परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयामार्फत समितीकडे सादर करून जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करणायत येईल नियुक्ती दिल्यानंतर जात पडताळणीसाठीच्या प्रस्ताव हा संबंधीतीकडे सादर केल्याची पोच उमेदवाराने कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.
- अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्राच्या छाननी शिवाय परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेद्वारांने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती किंवा कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे पूर्व चरित्र बरोबर नसल्याचे आढळल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी /नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.किंवा नियुक्ती दिल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यानंतर याबाबत उमेदवाराचा कोणत्याही प्रकारचा उजर एकूण घेतला जाणार नाही.
- या जाहिरातील नमूद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधीन असेल.
- उमेदवार हा महाराष्ट्रातील मूळ रहिवासी असावा. उमेवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याने डोमिसीअल प्रमाणपत्र प्राधिकृत अधिकाऱ्याकडून घेतलेले असावे डोमिसीअल प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील जन्माचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. उपरोक्त बाबत शासनाने वेळोवेळी विहित केकेल्या सक्षम अधिकार्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.
- शासकिय/निमशासकीय कर्मचार्यांनी त्यांच्या नियुक्ती प्रधीकार्याची परवानगी घेऊन अर्ज करावा निवड झालेल्या उमेदवारांना सदर पत्राची प्रत प्रमाणपत्र तपासणीवेळी सादर करावी लागेल.
- वेळोवेळी पदासाठी वेगवेगळा अर्ज करावा लागेल. परंतु एकाच वेळेस वेगवेगळ्या पदाची परीक्षा आली तर एकाच पदाच्या परीक्षेसाठी उमेदवाराला स्वेच्छेने बसता येईल.
- अनुभव प्रमाणपत्र मोघम नको. अनुभव प्रमाणपत्रावर संस्थेचा /कार्यालयाचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांक असणे आवश्यक आहे.संबंधित पदाचा अनुभव ग्राह्य धरण्यात येईल.
- नॉनक्रीमिलीयार प्रमाणपत्र निजीकाच्या काळात काढलेले असावे. (विमुक्त जाती ब भटक्या जमाती /विशेष मागास प्रवर्ग/ इतर मागास प्रवर्ग करिता आवश्यक) सदर प्रमाणपत्र दिनांक ३१ मार्च २०१८ च्या आर्थिक वर्षा पर्यंत वैद्य असणे आवश्यक आहे. वैद्य प्रमाणपत्र नसलेल्या उमेवारांच्या विचार केला जाणार नाही व अशा उमेवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही. जर उमेवारांचे खुल्या प्रवर्गाचे परीक्षा शुल्क भरले असेल तर त्यांचा अर्ज प्रवर्गासाठी ग्राह्य धरण्यात येईल.
- जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शक केंद्रात नाव नोंदणी केली असली तरीदेखील वरील पदासाठी रीतसर Online अर्ज अधिकृत संकेतस्थळावर भरणे, विहित परीक्षा शुल्काचा बँकेत भरणा करणे आवश्यक आहे.
- नैसर्गिक आपतीमुळे विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर अध्यक्ष उमेद एम.एस.आर.एल.एम. निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ हे ठरवतील त्या प्रमाणे सोयीच्या दिवशी लेखी व मुलाखती घेण्यात येतील याबाबत **www.zpyavatmal.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात येईल.
- सदर जाहिरातीमधील रिक्त पदाच्या संख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.परीक्षेचा प्रकार पदांची संख्या समांतर आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे/अंशतः बदल करणे ई. सर्व अधिकार हे अध्यक्ष उमेद एम.एस.आर.एल.एम. निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ स्वतः कडे राखून ठेवत आहे कोणालाही याबाबत प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयातदाद मागता येणार नाही.

- उमेदवारांनी त्यांचे निवडीबाबत किंवा निवडी नंतर पदस्थापानेबाबत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणल्यास तसेच पदस्थापनेत बदल करण्याबाबत विनंती केल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
- शासनाने विहित केलेली शारीरिक पात्रता प्रमाणपत्र व चांगली वर्तणूक असल्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.
- परीक्षेस पात्र /अपात्र उमेवारांची यादी, लेखी परीक्षेचा निकाल, प्रारूप निवड यादी, अंतिम निवड यादी व भरती प्रकीयेसंबंधित देण्यात येणाऱ्या सुधारित व अद्यावत सूचना कार्यालयाचे नोटीस बोर्डवर तसेच **www.zpyavatmal.gov.in** संकेतस्थळा वर प्रसिध्द करणायत येईल याबाबत स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.
- उमेद्वाराना लेखी परीक्षेस कागदपत्र तपासणीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल.
- प्रस्तुत भरती प्रक्रियेच्या वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.तसेच सदरील प्रक्रियेत काही बाबी नमूद करावयाच्या राहिल्यास किंवा अनावधानाने चुकीच्या नमूद केलेल्या असल्यस त्या प्रचलित शासन निर्देशानुसार/निर्णयानुसार लागू राहील.जाहिराती बाबत काही शंका असल्यास त्यांनी संबंधित खाते प्रमुख महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान,यवतमाळ यांना कार्यालयीन वेळेत समक्ष भेटावे.
- परीक्षेच्या दुसर्या दिवशी संवर्गनिहाय उत्तरतालिका जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,यवतमाळ च्या माहिती फलकावर व www.zpyavatmal.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
- उत्तर तालिका प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर आक्षेप असल्यास २ दिवसाच्या आत लेखी आक्षेप पुराव्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा अभियान संचालक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान,यवतमाळ यांच्या कार्यालयात किंवा या कार्यालयाचे ई मेल आयडी dmmuyavatmal@gmail.com यावर सादर करावेत उशिरा प्राप्त होणार्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.
- जाहिरातीत नमूद अटीत बदल जाहिरातीच्या काही भागात अंशतः बदल वा संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष उमेद MSRLM तथा मुख्य कार्यकारी अधिकरी जिल्हा परिषद यवतमाळ यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

**जिल्हा अभियान व्यवस्थापक**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**
**जिल्हा परिषद यवतमाळ**

**अध्यक्ष**
**उमेद एम.एस.आर.एल.एम. निवड समिती**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद यवतमाळ**